पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. ३१०१ दिनांक २७/०९/२०१९**

**वानवडी पो स्टे पुणे शहर**

दिनांक.२७/०९/२०१९

## प्रेसनोट

### देशी बनावटीचे गावठी कट्टा व चोरीची गाडी घेऊन फिरणारे इसम अटकेत वानवडी पोलीसांची कारवाई

दिनांक २६/०९/२०१९ रोजी २०.०० वा सुमारास वानवडी पोलीस स्टेशन पुणे शहर हद्दीत वाहन चोरीचे गुन्ह्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने सपोनि शेटे सो.यांचे सोबत तपास पथकातील सहा.पो.फौज.प्रदिप गुरव, पो.शि.६६६७ गिरमकर असे व निवडणुकीच्या अनुषंगाने गोपनीय पथकाचे पो.हवा ४१२० तेलंगे व पो.शि.१२००१ खरात असे संविधान चौक येथे खाजगी वाहनावर पेट्रोलींग करत असताना एक मोटार सायकलवर दोघे (डबलसीट) जोरात ए.बी.सी फार्म ते जगताप चौक या दिशेने जात असताना संशीत वाटयाले आम्ही त्यांना हाटकले व आडवण्याचा प्रयत्न केला असता ते आम्हास पाहुन भरधाव वेगाने जगताप चौकाच्या दिशेने निघाले असता त्यांना वरिल स्टाफचे मदतीने पाठलाग करुन सिकंदहार्ट टाऊन सोसायटी अपराजेय (सॅाविस सेंन्टर ) हॅाटेलच्या आलीकडे सार्वजनीक रोडवर वानवडी पुणे येथे २०.१५ वा.चे सुमारास ताब्यात घेतले ताब्यात घेतलेल्या इसमास आम्ही पोलीस असल्याचे सांगीतले.त्यानंतर गाडी चालवणारे इसमास नाव पत्ता विचारता त्यांनी त्याचे **नाव अनिकेत विनायक साकोरे वय १९ वर्षे रा.साईनगर साई मंदिर जवळ गहुचे देहु रोड पुणे** असे असल्याचे सांगितले पाठीमागे बसणारे इसमासे नाव पत्ता विचारता त्याने आपले नाव **समीर सरोवर तडवी वय १९ वर्षे रा.साईपार्क सी-१ लोणीकाळभोर ता.हवेली** जिल्हा पुणे असे असल्याचे सांगितले सदर इसमांना हटकल्यावर न थांबण्याचे कारण विचारता ते उडवा उडवीचे व असमाधानकारक उत्तरे देऊ लागले म्हणुन आम्हास त्यांचा जास्त संशय आल्याने त्यांचकडे अधिक चौकशी केली असता सदर इसमांकडे असलेली मोटार सायकल **पल्सर २२० तीचा आरटी ओ.नं.MH-14/CT-2767** हीचे बाबत चौकशी करुन कागदपत्रे मागितली असता सदरची मोटार सायकल ही चोरीची असल्याचे सांगितले तसेच वाहनचालका बरोबर असलेला इसम नामे **समीर सरोवर तडवी** याची अंगझडती घेतली असता त्याचे कमरेस एक देशी बनावटीचा गावठी कट्टा मिळुन आला व एक जिवंत कारतुस मिळुन आले त्यावेळी सदरची चोरीची मोटार सायकल व **गावठी कट्टा व जिवंत कारतुस** असा एकुण **कि.रु ७०,२००/-चा ऐवज** पंचासमक्ष जप्त करुन त्याचेकडे पिस्टल जवळ बाळगण्यासाठी सक्षम अधिकारी यांचे कडील परवाना आहे-काय याबाबत विचारणा केली असता त्याने कसलाही परवाना नसल्याचे सांगितले.त्यानंतर वानवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास सहा.पो.निरीक्षक श्री.आसाराम शेटे हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री.सुनिल फुलारे सो,अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,मा.श्री सुहास बावचे सो,पोलीस उप-आयुक्त परि-५ पुणे शहर,मा.श्री.सुनिल कलगुटकर सो,सहा.पोलीस आयुक्त वानवडी विभाग पुणे,श्री.क्रांतीकुमार पाटील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,सलीम चाऊस पोलीस निरीक्षक (गुन्हे),वानवडी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे** सहा.पो.निरीक्षक श्री.आसाराम शेटे **सहा.पो.फौजदार प्रदीप गुरव,पोलीस हवालदार दत्तात्रय तेलंगे,पो ना.ज्ञानदेव गिरमकर,पो.शि.शिरीष गोसावी ,गणेश खरात,सुदर्शन बोरावके,युवराज दुधाळ यांचे पथकाने केलेली आहे.**

वरिष्ठ पोलीस निरीक्षक
वानवडी पोलीस ठाणे पुणे शहर